दु:ख बदनाम

खोल दु:ख माझे, की हा चित्त विकार
पोखरुनी मन हे, दु:ख करी परिणाम ॥ १ ॥

मन अधांतरी की, ओशट आज विचार
मोकळे फिरेना हे, लेवून पंख लगाम ॥ २ ॥

आभाळ फाटले की, धरती झाली विराण
ये मनातुनी हे, भलते विचार तमाम ॥ ३ ॥

समजाविले तरीही, मनास नको विहार
देऊ कसे या, जटील प्रश्नांना पूर्णविराम ॥ ४ ॥

जरी दु:खात समजते, अस्सल सत्य विधान
परी का दुनियेत हे, हायSS असे बदनाम? ॥ ५ ॥

© sachin p. kulkarni
www.saarthbodh.com
sachin.kulkarni78@gmail.com